ISSN 2395-5937

# "Impact of Demonetization on Indian Society"



Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth
Pin-431516
Tq. Sonpeth Dist. Parbhani

**EDITOR**
Principal Dr. Panjab Chavan

**CO-EDITOR**
Prof. B.G. Munde,
Dr. P.D. Kharwadkar,
Dr. Kamal Phole,

साहित्यक्षुधा
विशेषांक-२०१७
प्रकाशक - संजीवकुमार पांचाळ

**प्रकाशक**

**डॉ. संजीवकुमार व्ही. पांचाळ**

समीक्षा प्रकाशन, नांदेड

© सर्व हक्क

प्राचार्य डॉ. पंजाब चव्हाण

**प्रथम आवृत्ती**

२३ फेब्रुवारी २०१७

अक्षरजुळवणी

**राजेश पटने**

चिखलवाडी कॉर्नर, नांदेड

फो. ९३२२०८१८०४

**मुखपृष्ठ**

**डॉ. भारत कचरे**

**किंमत रु. १५०/-**

**मुख्य संपादक**

प्राचार्य - डॉ. पंजाब चव्हाण

**संपादक मंडळ**

प्रा. बी.जी. मुंडे

प्रा.डॉ. पी.डी. खरवडकर

प्रा.डॉ. कमल फोले

**मार्गदर्शक**

डॉ. माधवराव किन्हाळकर

शेख मुरादसाहेब मांजरमकर

डॉ. वृषाली किन्हाळकर

**कै. दिगंबरराव बिंदू स्मारक समिती संचलित,**

दिगंबरराव बिंदू कला व वाणिज्य

महाविद्यालय भोकर जि.नांदेड.

फो. ०२४६७ - २२२८९२

Email – db.College@rediffmail.Com.

website -www.dbcbhokar.co.in

**टीप :- सदरील अंकातील व्यक्त झालेल्या विचाराशी संपादक, प्रकाशक सहमत असेलच असे नाही.**

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Dist.Parbhani Pin-431516




| अ. क्र. | लेखाचे नाव | लेखकाचे नाव | पेज नं. |
|---|---|---|---|
| 15 | Impact of Demonetization on Indian Society | Dr. Pradeep D. Shelke | 97 |
| 16 | Demonetization and ITS Effect on Consumer Behavour | Dr.Sidharth Jadhav | 101 |
| 17 | विमुद्रीकरणाचे भारतीय अर्थव्यवस्थेवरील परिणाम | प्रा.डी.के. मगर | 107 |
| 18 | नोटबंदी करण्यामागचा सरकारचा हेतू आणि वास्तव | भालेराव मारोती चंद्रकांत | 112 |
| 19 | निश्चलनीकरण व रोकड रहित अर्थव्यवस्था : अपेक्षा व वास्तव | डॉ. शिवप्रसाद डोंगरे | 117 |
| 20 | भारतीय रिझर्व्ह बँक : चलननिर्मीती व नोटाबंदी | प्रा. डॉ. एम. डी. कच्छवे | 123 |
| 21 | चलनबंदीचेभारतीय समाजावरील परिणाम एक आढावा | प्रा.डॉ.एच.डब्ल्यू कुलकर्णी | 127 |
| 22 | निश्चलीकरणाचे भारतीय अर्थव्यवस्थेवरील परिणाम | डॉ . रमाकांत घाडगे व प्रा. कूलकर्णी व्ही.व्ही. | 130 |
| 23 | विमुद्रीकरणाचे भारतीय अर्थव्यवस्थेवरील परीणाम | शिंदे अविनाश रामकिशन | 134 |


****

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani

# भारतीय रिझर्व्ह बँक : चलननिर्मीती व नोटाबंदी

- प्रा. डॉ. एम. डी. कच्छवे
वाणिज्य विभाग प्रमुख व
सहयोगी प्राध्यापक व संशोधन मार्गदर्शक
कै.रमेश वरपूडकर महाविद्यालय,
सोनपेठ जि. परभणी
Email. mkachave@gmail.com

**प्रस्तावना** (Introduction) :

सेवाक्षेत्रात अत्यंत महत्वाचा घटक म्हणजे बँकीग होय. प्रत्येक देशाची स्वत:ची एक राष्ट्रीय बँक असते. ती देशातील सर्व बँकाच्या कार्यपध्दतीवर लक्ष ठेवण्याचे काम करते. १ एप्रील १९३५ रोजी रिझर्व्ह बँकेची स्थापना झाली. सुरुपातीला ही बँक खाजगी स्वरुपाची होती. या बँकेचे भारत सरकामार्फत १९४९ मध्ये राष्ट्रीयीकरण करण्यात आले. त्यानंतर ही बँक भारत सरकारच्या मालकीची व पर्यायाने सरकारची झाली. राष्ट्रीय बँक या नात्याने रिझर्व्ह बँकेला अनेक महत्वाची जबाबदारी पार पाडावी लागते.

देशातील नाणी आणि नोटा चलन निर्मीती ही रिझर्व्ह बँककडून करण्यात येते. गरजेप्रमाणे आवश्यक ते तारण ठेवून रिझर्व्ह बँक चलन निर्मिती करते. कालबाह्य झालेले किंवा वापरण्यास योग्य नसलेल्या नोटा किंवा नाणी रद्द करण्याचा किंवा नष्ट करण्याचा अधिकार रिझर्व्ह बँकेलाच आसतो. भारताच्या चलन व्यवस्थेचे नियंत्रण व चलन धोरणाची निश्चिती व कार्यवाही ही रिझर्व्ह बँकेची प्राथमिक जबाबदारी आहे. देशभरातील मुद्रणालयाची मुद्रण क्षमता २६०० कोटी नोटांची असून या नोटा महाराष्ट्रातील 'नाशिक', मध्यप्रदेशातील 'देवास', कर्नाटकतील 'म्हैसूर' आणि पश्चिम बंगालमधील 'सालबोणी' येथे चालते.

चलनातील चलनी नोटा छापून घेण्याची, देशाच्या विविध भागात आवश्यक किमतीच्या नोटांचा पुरवठा करण्याची व सुरुळीतपणे सर्व आर्थिक चालू राहतील. याची काळजी घेण्याची संपूर्ण

जबाबदारी भारतीय रिझर्व्ह बँकेची आहे.

देशांतर्गत काळा पैसा बाहेर काढण्यासाठी केंद्र सरकारने उचललेले पाऊल धाडसी असले तरी फार मोठे 'काळे धन' हाती लागेल असे अजिबात वाटत नाही. काळ्या पैशाविरुध्दच्या या लढ्यात सामान्य माणूस भरडला जाऊ नये याची दक्षता सरकारला घेणे गरजेचे होते. भ्रष्टाचाराचा उगम हा रोख व्यवहारातून होतो व तो मोठ्या नोटावर चालतो. असे असूनही २००० रुपयाची नवीन नोट चलनात आणली. बँका व पोस्टासमोर लागलेल्या लांब लचक रांगा एक गंभीर मुद्दा असल्याचे मत सुप्रिम कोर्टाने नुकतेच नोंदविले आहे. नोटबंदीमुळे ८५ टक्के चलन रद्द बातल ठरले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दर दहा वर्षानी चलन बदलले गेले पाहीजे असा विचार मांडला होता.

**संशोधनाचा उद्देश :-**

सदर शोध निंबध पुढील उद्देश डोळ्यासमोर ठेवून करण्यात आला आहे.

१) भारतीय रिझर्व्ह बँकेचा इतिहास अभ्यासणे.

२) भारतीय रिझर्व्ह बँकेच्या चलन निर्मितीचा अभ्सास करणे.

३) नोटाबंदी नंतरच्या स्थितीचा अभ्यास करणे .

४) निष्कर्ष काढणे.

Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth
Pin-431516
Ta.Sonpeth Dist.Parbhani

**संशोधन पध्दती :-**

सदर शोध निबंधासाठी दुय्यम माहितीचा आधार घेतला आहे. दुय्यम माहितीत संदर्भग्रंथ, दैनिक वर्तमानपत्रातील लेख, मासिके, इत्यादीचा आधार घेतलेला आहे. वरील उद्देश डोळ्यासमोर ठेवून सामग्री संकलन करण्यात आले आहे.

**भारतीय रिझर्व्ह बँकेची चलननिर्मीती :-**

भारतीय रिझर्व्ह बँकेची स्थापना १ एप्रिल, १९३५रोजी झाली. या बँकेचे मुख्य कार्यालय मुंबई येथे आहे. भारतीय रिझर्व्ह बँक ही देशपातळीवर आर्थिक संस्थाना शिस्त आणण्याचे काम करते. भारतीय रिझर्व्ह बँक ही वार्षिक तसेच तिमाही आर्थिक धोरण व पत धोरण जाहीर करते.

भारतीय रुपया हे भारतीय गणराज्याचे अधिकृत चलन आहे. भारतीय चलनात नोटा आणि नाणी वापरली जातात. सर्व भारतीय नोटा या भारतीय रिझर्व्ह बँकेमार्फत बनविल्या जातात. सध्या पाच रुपायापासून (५, १०, २०, ५०, १००, ५००) आणि २००० रुपया पर्यंतच्या नोटा चलनात आहेत. एक आणि दोन रुपायाच्या नोटा आरबीआय छापत नाही. दिनांक १५ जुलै, २०१० रोजी झालेल्या भारताच्या केंद्रीय मंत्री मंडळाच्या बैठकीत भारतीय रुपयासाठी प्रतिक चिन्ह (₹) तयार करण्यात आले आहे. डी. उदयकुमार या आय टी आयच्या विद्यार्थ्याने तयार केलेल्या रेखांकनाची यासाठी निवड करण्यात आली आहे. भारतीय नोटा चलन म्हणून स्विकारण्यास योग्य असलेल्या प्रमाण आणि सरकारतर्फे खात्री म्हणुन आरबी आयचे सर्वोच्च अधिकारी गव्हर्नर नोंटावर एक वचननामा लिहीतात आणि त्यावर आपली स्वाक्षरी करतात. सर ओस्बॉर्न स्मिथ हे भारतीय रिझर्व्ह बँकेचे पहिले गव्हर्नर होते. त्यांनी १ एप्रिल , १९३५ रोजी आपला कार्यभार स्वीकारला त्या काळातील एकाही नोटावर

त्यांची स्वाक्षरी नाही. सर जेम्स ब्रेड टेलर हे आरबीआयच्या नोटांवर सही करणारे पहिले गव्हर्नर होते. गव्हर्नर एल. के. झा. यांच्या काळात (१९६७ - १९७०) महात्मा गांधी यांच्या जन्मशब्दाधी वर्षानिमित्त दोन, पाच, दहा आणि शंभर रुपायाच्या नोटा निघाल्या, १०००, ५,०००,आणि १०,००० रुपये किमंतीच्या नोटा १९५४ मध्ये चलनात आणल्या. जानेवारी १९७८ मध्ये १,०००, ५,००० आणि १०,००० रुपये किमतीच्या नोटा रद्द करण्याचा निर्णय तत्कालीन पंतप्रधान मोरारजी देसाई यांच्या सरकारने घेतला. त्यावेळी गव्हर्नर डॉ. आय. जी. पटेल हे होते. रा. ना. मल्होत्रा यांच्या काळात १९८७ - ८८ मध्ये ५०० रुपये किमतींच्या नोटा चलनात आणल्या आणि २००० साली १००० रुपयाची नोट पुन्हा चलनात आणली.

४ सप्टेंबर, २०१६ पासून उर्जित पटेल यांची भारतीय रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर म्हणून नेमणूक करण्यात आली. ते भारच्या रिझर्व्ह बँकेचे २४ वे गव्हर्नर आहेत. यांच्या काळात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशाला संबोधित करताना दि. ०८ ऑक्टोंबर २०१६ रोजी सायंकाळी ०८ वाजुन १७ मिनीटाला देशातील चलनात प्रचलित असलेल्या ५०० व १००० रुपये मुल्यांच्या नोटा रद्द करण्यात येत असल्याचे घोषित करुन सदर निर्णयांची अमलबजावणी ८ ऑक्टोबरच्या रात्री १२ :०० वाजता सुरु करण्यात आली. काळा पैसा आणि भ्रष्टाचार यामुळे देशाच्या अर्थव्यवस्थेला निर्माण झालेल्या धोक्यापासून तिचे संरक्षण करण्याच्या दृष्टीने हा निर्णय घेत असल्याचे पंतप्रधानांनी आपल्या ४० मिनीटांच्या भाषणात देशवासियांना संबोधित करतांना सांगितले. जुन्या नोटा बदलण्यासाठी ३० डिसेंबर २०१६ पर्यंत बँका किंवा पोस्ट ऑफिसमध्ये जमा करण्यात याव्यात असे पंतप्रधानांनी सांगितले १० नोव्हेंबर, २०१६ रोजी भारतीय चलन इतिहासात २००० रुपयाची नोट चलनात आणण्याची ही प्रथम वेळ आहे.

**५०० व १,००० रुपयांच्या चलनातील नोटा बंदीनंतरची स्थिती :-**

०८ ऑक्टोंबर २०१६ रोजी केंद्र सरकारने देशात चलनात असलेल्या ५०० व १००० रुपये किमतीच्या नोटा रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे. भारतात केल्या जाणाऱ्या काळ्या पैश्यांच्या व्यवहारात ५०० आणि १००० रुपयांच्या नोटा मोठ्या प्रमाणात वापरल्या जात होत्या काळापैसा व भ्रष्टाचार या गोष्टीमुळे देशाचे प्रचंड प्रमाणात नुकसान होऊन त्याचा फटका गरीब जनतेला बसतो भारतात व भारता शेजारील देशात बनावट भारतीय चलन निर्माण करण्यात येत होते. त्याचा विपरीत परिणाम भारतीय अर्थव्यवस्थेवर होत होता तसेच मोठ्या प्रमाणात भारतात विविध स्तरांवर होणाऱ्या निवडणुकामध्ये काळापैसा वापरण्यात येत होता म्हणून चलनातील नोटाबंदीचे कारण सांगण्यात आले. सरकारच्या नोटा बंदीच्या निर्णयाचा समाजातील सर्वच घटकास त्रास सहन करावा लागला. ग्रामीण भागातील सर्वच क्षेत्रावर नोटाबंदीच्या निर्णयाचा विपरीत परिणाम झाला. गावोगावच्या यात्रा, उत्सव, घराची बांधकामे, लग्नकार्य, प्लॉट खरेदी, गंभीर आजार व शेती खरेदी इत्यादी पैशाअभावी ठप्प झाली आहेत. सर्वत्र नोटाबंदी व नोटा बदली हे दोन प्रश्न चर्चीला जात आहेत. नोटा असुनही कांही लोकांना आपले व्यवहार पूर्ण करण्यासाठी कसरत करावी लागत आहे. नवे



Sonpeth 431516
Sonpeth Dist. Parbhani
ACS College

नसतांना देखील बँकवाले २००० रुपयाची नोट देत आहेत. त्यांच्या सुट्यापैशासाठी भटकेंती करावी लागत आहे. १०० किंवा २०० रुपयांची खरेदी केल्यास उर्वरित चिल्लर पैसे कसे द्यायचे असा सवाल व्यापारी करीत आहेत. शेतकऱ्यांना मातीमोल भावाने मालाची विक्री करावी लागत आहे. सामान्य जनता कष्टातुन मिळविलेल्या नोटा बदलण्यासाठी जीव घेणा आटापीटा करीत आहेत. हातावर पोट असणाऱ्यांना दैनंदिन गरजेसाठीही आपले खात्यातून वेळेवर मिळत नाहीत. ग्रामीण भागातील छोटे दुकानदार, रोज मजुरी करणारे कारागीर व लघु उद्योगातील व्यासायिक यांचा कोंडमारा होत आहे. कृषी उत्पन्न बाजार समितीतील खरेदी विक्री मंदावली महिलांना पतीराजाच्या अपरोक्ष बचत केलेली रक्कम उघड करुन नोटा बदलण्यासाठी बॅक खात्यात जमा करावी लागली. बॅकेतील कर्मचाऱ्यांचे 'सॉरी' शब्द ऐकूण ग्राहकही वैतागले आहेत. आपल्या खात्यावर असलेला पैसा उचलता येत नाही. रांगेत थांबुनही पैसा मिळत नाही. मिळलाच तर हवा तेवढा मिळत नाही. बँकेत चलन कधी येईल, ग्राहकांना कधी वाटप होईल हे कर्मचाऱ्यांना सांगणे कठीण जात आहे. घर खर्च, दवाखान्यासह इतरखर्च भागविले अवघड होत आहे. ग्रामीण भागातील लोक सकाळपासुन बँकेसमोरील उभे राहतात. बँकाकडून आठवड्याला २४००० रुपये देण्याचे जाहीर केले, परंतु रोकड टंचाईचे कारण पुढे करुन अनेक बँका २४००० ऐवजी २०००, ४०००, ५००० किंवा १०००० रुपये ग्राहकांना देत आहेत. शेतकऱ्यांनी बँकेचे कर्ज काढुन शेती पिकविली, परंतु नोटाबंदीमुळे शेतकऱ्यांच्या शेतीमालाची खरेदी विक्री नाही शेतालाचे भाव पडलेले आहेत. त्यामुळे शेतकरी अडचणीत सापडले आहेत. आर्थिक उलाढांलीना अजूनही गती आलेली नाही. सामान्य व्यक्ती गरजे पुरते साहित्य खरेदी करुन जास्तीत जास्त पैसे स्वत:कडे शिल्लक ठेवत आहे. वधू - वर पित्यांची चांगलीच अडचण झाली आहे. काटभार करुन विवाह सोहळे साजरे केले जात आहेत काहीजन विवाह सोहळे पुढे ढकलत आहेत. चलनातील चलनी नोटा छापून घेण्याची, देशाची विविध भागामध्ये आवश्यक किमतीच्या नोटांचा पुरवठा करण्याची व सुरुळीतपणे सर्व आर्थिक व्यवहार चालु राहतील याची काळजी घेण्याची संपूर्ण जबाबदारी भारतीय रिर्झव्हे बँकेची आहे. सध्याच्या काळात बँकेत पासबुक घेवून पैसे काढण्याचे दिवस आता राहिलेल नाहीत. एटीमच्या साह्याने कोणत्याही ठिकाणाहून कोणत्याही वेळेत पैसे काढलेले जाऊ शकतात. कॅशलेस व्यवहारासाठी मोबाईल ॲप, प्रिपेड कार्ड. डेबिटकार्ड, क्रेडीट कार्ड, इंटरनेट बँकींग, ई - वालेट यासारख्या सुविधा बरोबर व्यवहार शक्य आहेत. हळूहळू परिस्थिती पूर्वपदावर येत आहे. परंतु जोपर्यंत बँकाम चलन लोकांकडून भरल्या जात नाही जोपर्यंत अडचणी वाढत जाणार आहेत. समाज हितासाठी, भ्रष्टाचार कमी करण्यासाठी हा क्रांतीकारी निर्णय म्हणावा लागेल.

****

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Ta. Sonpeth Dist. Parbhani

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani